ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-I | ISSUE-II | JULY | 2014

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# अध्यापक महाविद्यालयातील गुणवत्ता विकासासाठी माणवी स्त्रोताची भुमीका:एक अभ्यास

डॉ.सुनीता वाय.पाटील
सहा. प्राध्यपिका
शिक्षणशास्त्र संकुल,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड

**प्रस्तावना :**

शिक्षणामध्ये गुणवत्ता विकासामध्ये मानवी स्त्रोताची भूमिका महत्वपूर्ण ठरते.गुणवत्तापूर्ण शिक्षण गुणवत्तापूर्ण शिक्षक तयार करते.समाजाचा ,राष्ट्राचा कवोस शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो.शिक्षणाची गुणवत्ता ही मानवी स्त्रोतांवर अवलूबून असते. मानवी स्त्रोतांमध्ये शिक्षक किवा अध्यापक गृहित धरलेला आहे. गुणवत्ता विकासामध्ये अध्यापकाची गुणवत्ता महत्साची असते.

शिक्षण प्रशिक्षणाथ्याची गुणवत्ता ही त्याला प्रशिक्षण देणा—या अध्यापकाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. कारण त्या प्रकारची गुणवत्ता प्रशिक्षणाथ्यामध्ये उतरवावयाची असेल तर अध्यापकामध्ये प्रथम असावयाला हवी. शिक्षक शिक्षणसंदर्भात डी.आर.गोयल म्हणतात.

‘Teacher education is developing the human resource of the entire sphere if the teachers are in shape them the nation is in shape also the nation as a whole has due concern for teacher education.’

अध्याापकाचे अध्यापनातील गुणवत्ता प्रभावी होण्यासाठी दृअध्यापकाने तीन पाय—यामधून जाणे अत्यावश्यक आहे.त्या तीन पाय—या खालील प्रमाणे —

1- **माहिती** (Information )
2- **ज्ञान** (knowledge )
3- Monitoring

या विषयीचे मत मा. कुलगुरू एस.बी.निमसे सर यांनी मांडले.

ध्येय केंदित शिक्षण म्हणजे शिक्षणातील गुणवत्ता होय. ध्येयामण्ये वैयक्तिक व सामाजिक अशा दोन्हीही ध्येयांचा समन्वय साधता येतो. ध्येयकेंदित शिक्षण या अर्थाने गुणवत्ता युक्त शिक्षणाचे खालल निकष सांगता येतील.

१. विद्यार्थ्याच्या गरजेची पूर्तता साधणारे शिक्षण.

२. विद्यार्थ्याचा सतत विकास साधणारे शिक्षण.

३. विद्यार्थ्यांना सतत व्यवसायभिमुख बनविणारे शिक्षण.

४. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुणांचा विकास करणारे शिक्षण.

५. विद्यार्थ्यांमध्ये आत्मशक्तीचा विकास करणारे शिक्षण.

**संशोधनाची उदिष्टे :—**

१. अध्यापक महाविद्यालयामध्ये गुणवत्ता शिक्षणासाठी मानवी स्त्रोतांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

२. अध्यापक महाविद्यालयातील गुणवत्ता शिक्षणाच्या बाबत सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.

३. अध्यापक महावद्यालयातील भौतिक घटकांच्या उपलब्धतेविषयी माहिती मिळविणे.

४. गुणवता शिक्षणासाठी मानवी स्त्रोतासाठी आवश्यक असणा—या निकषांचा अंभ्यास करणे.

५. अध्यापक महाविद्यालयामध्ये गुणवत्ता शिक्षणासाठी करीत असलेलया प्रयत्नांचा आढावा घेणे.

६. गुणवत्ता शिक्षणासाठी आवश्यक असणा—या इतर घटकाविषयी माहितकी मिळविणे.

७ गुणवत्ता शिझणासाठी अचूक अशा शिफारशीसूचविणे.

८. गुणवत्ता शिक्षणासाठी उपाय योजना सुचविणे.

**संशोधन परिकल्पना :—**

१. अध्यापक महाविद्यालयामध्ये गुणवत्ता शिक्षणासांठी निकषांचा अभ्यास करून प्रयत्न केला जात नाही.

२. अध्यापक महाविद्यालयामध्ये अधिव्याख्याताची भरती करतांना ,गुणत्तेच्या निकषाव्यतिरिक्त संस्थाचालक हस्तक्षेप करतात.

३. अध्यापक महाविद्यालयामध्ये गुणवत्ता शिक्षणांसाठी आवश्यक असणा—या भौतिक घटकांच्या उपलब्धतेमध्ये कमतरता आढळते.

४. अध्यापक महाविद्यालयामध्ये गुणवत्ता शिक्षणासाठी प्राचार्य विशेष प्रयत्न करत नाहीत.

**संशोधन गृहीतके :—**

१. गुणवत्ता शिक्षणासाठी मानवी स्त्रोतामध्ये अधिव्याख्याताची भूमीका महत्वाची असते.

२. गुणवत्ता शिक्षणामध्ये प्राचार्याची भुमीका महत्वाची असते.

३. गुणवत्ता शिक्षणासाठी भौतिक घटकांची उपलब्धता आवश्यक असते.

४.  गुणवत्ता शिक्षणामध्ये मानवी घटक आणि भौतिक घटकांचा समन्वय महत्वाचा असतो.

### संशोधनाची व्याप्ती :–

१.  प्रस्तूत संशोधन हे नांदेड शहरातील अध्यापक महाविद्यालयापुरते व्याप्त आहे.

२.  प्रस्तुत संशोधनामध्ये मानवी स्त्रोतांचा विचार करतांना त्यामध्सये अध्यापक महाविद्यालयातील प्राचार्य आणि अधिव्याख्यांता यांचाच समावेश केला आहे.

३.  प्रस्तुत संशोधनामध्ये गुणवत्ता शिक्षण्कासाठी अध्यापक महाविद्यालयामध्ये अधिव्याख्यात्या व्दारे संबधितांना ठरविलेले निकष आणि त्या निकषांचा प्रशिक्षणार्थ्यावर होणारा परिणाम लक्षात घेतला आहे.

### संशोधन विषयाची उपयुक्तता व महत्व

१.प्रस्तुत संशोधनामुळे गुणवत्ता शिक्षणाचे निकष समजण्यास मदत होईल.

२.या संशोधनातून मिळालेल्या निष्कर्षाची महाविद्यालयाने प्रत्यक्ष उपयोजन केले तर संस्था,विद्यालये महाविद्यालयाच्या गुणवत्ते मध्ये सुधारणा होण्यास मदत होईल.

३.या संशोधन कार्याच्या उपयोजनामुळे महाविद्यालयाचा खालावलेला दर्जा उंचावण्यास मदत होईल.

४..या संशोधन कार्याच्या उपयोजनामुळे महाविद्यालयाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल.

५.गुणवत्तापूर्ण शिक्षणासंदर्भात एकवाक्यता निर्माण करण्यासाठी.

### संदर्भ ग्रंथसूची

**१**.गीता राय (२००८) 'शैक्षणिक गुणवत्ता' एस.पी.एच.,प्रकाशन,दिल्ली.

२.भिंताडे वि.रो.(२००५) 'शैक्षणिक संशोधन पध्दती' नित्या नुतन प्रकाशन,पुणे.

३-सिंग यु.के.,सक्सेना जस्ना (२००९)'शैक्षणातील गुणवत्ता',डिस्कव्हर,प्रकाशन,दिल्ली.

४ UNICEF Repot on quality education (2005-2006)

५ UNESCO report on understanding Educational Quality 2005

६ Buch M.B., (Fifth Survey of Research in Education – Volume No.- I